# जेम्स पार्किन्सन्स

श्री. शेखर बर्वे

**श्री. शेखर बर्वे हे पार्किन्सन्स मित्रमंडळाच्या कार्यकारिणीचे गेली अनेक वर्षे सभासद आहेत. त्यांच्या पत्नी पार्किन्सन्स च्या शुभार्थी आहेत व श्री. बर्वे हे एक आदर्श शुभंकर (रुग्ण साहाय्यक) आहेत. ते मंडळाचे अतिशय तळमळीचे व सक्रिय कार्यकर्ते आहेत. पार्किन्सन्स विषयीच्या सर्वंकष माहितीचे त्यांनी लिहिलेले पुस्तक प्रकाशनाच्या वाटेवर आहे. प्रस्तुत लेख हा त्यांच्या आगामी पुस्तकातून घेतलेला आहे. तरुणांना लाजवेल अशा उत्साहात ते आजही (वय वर्षे ७५+) मंडळाच्या कार्यात सहभागी असतात. पार्किन्सन्स मित्र मंडळातर्फेच त्यांच्या आगामी पुस्तकाचे लवकरच प्रकाशन होणार आहे.**

## डॉ. जेम्स पार्किन्सन्स
## (११.०४.१७५५ ते २१.१२.१८२४)

इंग्लंडमधील लंडनजवळील शोरेडिच येथील एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व, ते अत्यंत हुशार व विविध विषयात रस घेणारे संशोधक म्हणून नावाजलेले होते. डॉ. जॉन हंटर या संशोधकाबरोबर काम करताना त्यांनी शरीरशास्त्र, शस्त्रक्रिया, दंतचिकित्सा, पचनसंस्था, आंत्रपुच्छ व संभोगजन्य आजार अशा अनेक विषयांवर बहुमोल असे लिखाण केले. 'आकाशातील वीजेचे परिणाम' हा त्यांचा पहिला संशोधनपर निबंध होता. १७९९ ते १८०७ यादरम्यान आरोग्यशिक्षणावर 'निसर्गोपचार' नावाची लेखमाला प्रस्तुत केली. पुरातन जगातील प्राणी व वनस्पतींचे अवशेष यांवर तीन ग्रंथ लिहिले. प्राणी व वनस्पतींच्या अवशेषांचा त्यांच्याकडे मोठा साठा होता. तीन प्रकारांच्या अवशेषास त्यांचे नाव दिले गेले.

१८१७ साली त्यांनी लिहिले "Shaking Palsy" या निबंधात एका आजारासंबंधीच्या लक्षणांचा प्रथम उल्लेख असा केलेला आढळतो - ''शारीरिक कंप, पुढे झुकलेला शरीराचा बांधा व चालण्याचा अनियमित वेग''. हे मूळ लक्षणांचे त्रिकुट त्यांच्या नोंदीत महत्त्वाचे होते. अनेक रुग्णांमध्ये त्यांना अशी लक्षणे आढळली, पण हा कोणता आजार आहे हे मात्र गूढच राहिले. त्यांनी कोणत्याही रुग्णाची प्रत्यक्ष तपासणी केलेली नव्हती. त्यांच्या हयातीत या नोंदींची दखल अजिबात घेतली नाही किंवा त्यांची निरीक्षणे मान्यताप्राप्त झाली नाहीत.

१९२० पर्यंत हा आजार 'हलणारा पक्षाघात' वातव्याधी किंवा लॅटिन भाषेतील वर्णनाप्रमाणे 'Paralysis Agitans' या नावांनी ओळखला जात असे. हा आजार कशामुळे होतो याचे काहीच कारण न कळल्याने त्यास Idiopathic Disease म्हणून पण ओळखले गेले. पॅरीसच्या डॉ. जीन मार्टिन चारकोट यांनी डॉ. पार्किन्सन्स यांच्या निबंधातील नोंदीकडे लक्ष वेधले व फ्रेंचमध्ये Eponym "LA medie de Parkinson" असा उल्लेख केला. कालांतराने मात्र ज्यांनी प्राथमिक लक्षणांचा उल्लेख नोंदविला व ज्ञात करून दिला त्यांच्याच नावाने म्हणजे ''पार्किन्सन्सचा आजार' म्हणून ओळखला जातो.

पण डॉ. जेम्स पार्किन्सन्स यांच्या निधनानंतर प्रत्यक्ष इंग्लंडमध्ये त्यांना श्रद्धांजली वाहिली गेली नाही किंवा शोकसंदेश नोंदविला गेला नाही, त्यांच्या थडग्यावर त्यांच्या नावाची पाटी नाही की, त्यांचे छायाचित्र अधिकृतपणे उपलब्ध नाही.

**''परि तयांच्या दहनभूमीवर**
**नाही चिरा, नाही पणती,**
**दिव्यत्त्वाची जेथ प्रचिती,**
**तेथे कर माझे जुळती''**

●●●